ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम

**डॉ.अनिल मुरलीधर कठारे**
प्रोफेसर, विभाग प्रमुख व संचालकपदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार जि. नांदेड.

***प्रस्तावना :***



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. त्यावेळी ते भारताचे कायदेमंत्री होते. त्यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामच्यावेळी भारत सरकारला दिलेला कायदेविषयक सल्ला व केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. याचवेळी त्यांनी हैदराबाद राज्यातील दलित नेते व समाजालाही मार्गदर्शन केले व हैदराबादच्या निजामाच्या विरोधात उभे केले.

**हैदराबाद राज्याची स्थापना :**

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास ५६३ देशी राज्ये आणि संस्थाने होती. या राज्यांचा आणि संस्थानांचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पहात असत. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही राज्या होती. यामध्ये हैदराबादचे राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते, म्हणून ते महत्त्वाचे होते. मोगल सम्राट औरंगजेब २० फेब्रुवारी १७०७ रोजी मरण पावले. तयांच्यानंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल व कर्तृत्वहीन निघाले. याचाच फायदा घेऊन दक्षिणेचे सुभेदार मीर कमरुदीन चिन कुलीज खान निजाम उल मुल्क यांनी ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधिशांना निजाम व आसफजाह या नावाने ओळखले जात असे. हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होता.

मोगल काळात दख्खनची ( दक्षिण भारत ) विभागणी प्रशासनाच्या सोयीसाठी खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर आणि हैदराबाद या सहा सुभ्यांत करण्यात आलेली होती. औरंगाबाद हे या सुभ्यांच्या कारभाराचे मुख्यालय होते. या सहा सुभ्यांचा कारभार पाहण्यासाठी एका सुभेदाराची नियुक्ती मोगल सम्राटाकडून केली जात असे. त्यालाच दक्षिणेचा सुभेदार असे संबोधिले जाई. मोगल सम्राट फर्रुखशियर यांनी इ.स. १७१३ मध्ये मीर कमरुद्दीन निजाम उल मुल्क फिरोजजंग खान खानान चिन कुलीजखान यांची दक्षिणेचे सुभेदार म्हणून नियुक्ती केली. औरंगजंब या मोगल सम्राटाच्या मृत्युनंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल निघाले. तसेच सत्तेसाठी त्यांच्या उत्तराधिकाऱ्यात संघर्ष सुरु झाले. त्यामुळे देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्याचाच फायदा घेऊन दख्खनचा सुभेदार मीर कमरुद्दीन यांनी ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची१ स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. मीर कमरुद्दीन यास मोगल सम्राट महम्मदशहा यांनी आसिफजाह हा किताब दिला होता. त्यामुळे त्याच्या घराण्यास आसिफजाह (आसफजाही, आसफिया, आसिफजाही ) घराणे असे संबोधिण्यात आले.

**हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम म्हणजे काय ?**

१८ जुलै १९४७ मध्ये ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले. वरील कायद्यानुसार देशी राज्य आणि संस्थानिकांनाही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की, स्वतंत्र राहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळे देशी राज्य व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करुन घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतु हैदराबाद राज्याचा सत्ताधीश निजाम मीर उस्मान अली खान याने ११ जून १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले.

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैदराबाद राज्याचा सत्ताधीश मुसलमान होता. परंतु राज्यात ७०% हिंदू, १८ टक्के दलित, ११ टक्के मुसलमान आणि १ टक्का इतर लोक होते. तसेच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहणे राज्यातील जनतेच्याच नव्हे तर देशाच्याही हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद राज्याच्या भारतातील विलनीकरणाशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह, सशस्त्र आंदोलन केले. शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करुन ते भारतीय संघराज्यात विलीन करुन घेतले. हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले, हेच आंदोलन भारतीय इतिहासात हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम या नावाने ओळखले जाते. हा स्वातंत्र्य संग्राम भारतीय स्वातंत्र्य आंदोलनचाच एक भाग होता. या स्वातंत्र्य संग्रामात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैदराबाद राज्य संबंध :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैदराबाद राज्यातील दलितांचे प्रबोधन करुन संघटन केले. यासाठी त्यांनी राज्याच्या सरहद्दीवर दलितांच्या सभा घेतल्या. कारण त्यांना हैदराबाद राज्यात प्रवेश करण्यास परवानगी नव्हती. इ.स. १९२७ नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हैदराबाद राज्याशी संबंध येत गेला. इ.स. १९२० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुकनायक हे मराठी भाशेतील पाक्षिक मुंबई येथुन सुरु केले. इ.स. १९२३ मध्ये पाक्षिक बंद पडले. पुढे त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र मुंबई येथुनच जनता नावाचे पाक्षिक सुरु केले. इ.स. १९५६ पर्यंत हे पाक्षिक सुरु होते. ही सर्व वृत्तपत्रे हैदराबाद राज्यात येत होती. हैदराबाद येथुन निजाम विजय हे साप्ताहिक मराठी भाषेत प्रसिध्द होत होते. साप्ताहिकाचे संस्थापक संपादक लक्ष्मणराव फाटक यांनी १२ एप्रिल १९२७ च्या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय कार्याची प्रशंसा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद जवळील माळीवाडा येथील चोखोबा साठे यांच्या विनंतीवरुन १५ ऑक्टोबर १९३३ रोजी प्रथमच औरंगाबादला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी माळीवाडा येथे चोखोबा साठे यांच्या नेतृत्वाखाली दादाराव काळे, मोहनराव जोगदंड, शामराव पुंजाजी केदार, पोचन्ना मल्यामती येलू यांनी मोठ्या उत्साहाने भव्य स्वागत केले. त्यानंतर संध्याकाळी बाबासाहेब औरंगाबाद येथील पैठणगेट येथे श्री कांबळे व इंगळे यांच्या विनंतीवरुन जेवणासाठी गेले. त्यावेळी तेथील चावडीत औरंगाबादमधील बेगमपुऱ्यातील दलित नेतेमंडळी हजर होती. त्यामध्ये बेगमपुऱ्याचे चतरु पनाजी, किराडपुऱ्याचे इंगळे व किलेअर्कचे वामनराव कांबळे हे प्रमुख होते. त्यामुळे बाबासाहेबांनी जेवण करण्यापूर्वी सभा घेण्याचे ठरविले. पण त्यांच्या सभेला स्थानिक अधिकाऱ्याने परवानगी न दिल्यामुळे त्यांनी चावडीसमोरच बैठी सभा२ घेतली व दलितांना मार्गदर्शन केले. दलित प्रबोधनासाठी बाबासाहेबांनी घेतलेली ही बैठी सभा मराठवाड्यातील पहिलीच सभा होती. २४ डिसेंबर १९३४ रोजी त्यांनी आपल्या सहकाऱ्यासह वेहरुळची लेणी व दौलताबादचा किल्ला पाहण्यासाठी सहल काढली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई असेंबलीच्या निवडणुकीत यशस्वी झाले होते. त्यांच्या अभिनंदनाची सभा सिकंदराबाद३ येथे फेब्रुवारी १९३७ मध्ये घेण्यात आली. अस्पृश्य समाजाची ही सभा बाजी कृष्णराव वकिल यांच्या बंगल्याच्या आवारात बी.एस. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत बाबासाहेबांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. बाबासाहेबांच्या निवडणुकीच्यावेळी मुंबई येथील मतदारासाठी बाजी कृष्णराव यांनी इंग्रजी पत्रके काढून महत्त्वाची कामगिरी केली. त्याबद्दल या सभेत त्यांचेही अभिनंदन केले गेले. यावेळी काशीनाथ बाबा बंदसोडे, बाजी कृष्णराव, एल. लक्ष्मीया व एस. श्यामराव यांनी भाषणे केली. याच सभेत सिकंदराबाद महार असोसिएशन स्थापन केली. या संघटनेचे पदाधिकारी खालील प्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| १) अध्यक्ष | - | अंबाजी सोनाभनजी सोनकांबळे |
| २) सचिव | - | सोपानराव धन्वे |
| ३) सदस्य | - | सुंदरनाथ किशनराव गायकवाड |
| ४) सदस्य | - | चैतन्यबाबा |
| ५) सदस्य | - | जगन्नाथ रामजी गायकवाड |
| ६) सल्लागार | - | बी.के. राव |

### हैदराबाद राज्यातील दलितांचे संघटन :

हैदराबाद राज्यातील अस्पृश्य दलित समाज मुस्लिम आणि हिंदू समाजाच्या गुलामगिरीतून जीवन जगत होता. अस्पृश्यतेच्या नावाखाली त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात होती. त्यांना सार्वजनिक मंदिरे, पणवठे व विहरीवर प्रवेश करण्यास मनाई होती.

त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे प्रथम त्यांच्यात प्रबोधन घडवून आणणे महत्त्वाचे होते. हे कार्य बाबासाहेबांनी हाती घेतले. त्यांना हैदराबाद राज्यात प्रवेश करण्यास मनाई होती. त्यामुळे राज्याच्या सरहद्दीवर दलितांच्या सभा घेऊन त्यांनी त्यांचे प्रबोधन व संघटन केले.

हैदराबाद राज्यात भाषण स्वातंत्र्यावर बंदी होती. त्यामुळे सरकारने बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना निजाम राज्यात प्रवेश करण्यास व सभा घेण्यास बंदी घालण्यात आली. याला उत्तर म्हणून भाऊसाहेब मोरे व भिकाजी काशीराम थोरात यांनी हैदराबाद राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या पूर्व खानदेशातील चाळीसगाव तालुक्यातील कसबे मक्रणपूर ( डांगरा ) येथे ३० डिसेंबर १९३८ रोजी औरंगाबाद जिल्हा दलित परिषदेचे आयोजन केले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष शामराव भिकाजी जाधव होते. भाऊसाहेब मोरे यांनी घरातील सोने विकून या परिषदेचे आयोजन केले होते. मक्रणपूर हे त्या काळात इंग्रज राजवटीच्या हद्दीत होते. मक्रणपूर येथील औरंगाबाद जिल्हा दलित परिषदेचे संयोजक भाऊसाहेब मोरे व भिकाजी काशीराम थोरात होते. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या परिषदेला आले होते. मक्रणपूर येथील औरंगाबाद जिल्हा दलित परिषद ही हैदराबाद राज्यातील पहिलीच सभा होती. या सभेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मक्रणपूर हे गाव औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड या तालुक्याला लागूनच चाळीसगावच्या हद्दीत होते. आज हे गाव कन्नड नगरपालिकेच्या हद्दीतील वसाहत असून त्यास 'भीमपूरा' म्हणतात. या परिषदेसाठी मुंबई विधानसभेतील स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार भाऊसाहेब गायकवाड, दौलतराव जाधव, जिवाप्पा ऐदाळे, प्रभाकर रोहम व तोरणे मास्तर हे पुढारी आले होते. शिवाय औरंगाबाद, वैजापूर, गंगापूर, सोयगाव, सिल्लोड, खुलताबाद व चाळीसगाव येथून बहूसंख्येने दलित हजर होते. ही परिषद नदीच्या काठावर आंबराईत भरली होती. बाबासाहेब दुपारी साडे चार वाजता सभास्थळी आले, तेव्हा त्यांचे स्वागत जयजयकाराच्या घोषणांनी व टाळ्याच्या कडकडाटात करण्यात आले. परिषदेचे स्वागताध्यक्ष शामराव भिकाजी जाधव यांनी केलेल्या प्रास्ताविक भाषणात संस्थानातील दलितांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीवर प्रकाश टाकून त्यांनी निजाम सरकारच्या प्रशासनावर प्रखर टीका केली.

एस.बी. जाधव आपल्या भाषणात म्हणाले, "संस्थानातील अस्पृश्य वर्ग अत्यंत मागासलेला असून त्यांना मोफत शिक्षण दिले जात नाही, शिष्यवृत्ती दिली जात नाही, शाळेत प्रवेश दिला जात नाही आणि प्रवेश दिलाच तर त्यांना स्वतंत्र वेगळ्या जागेवर बसविले जाते." निजामाने स्थापन केलेल्या शाळांची संख्या लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत कमी आहेत.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी संस्थानातील शैक्षणिक सोयीचा अभाव, सामाजिक गुलामगिरी, वेठबिगारी व आर्थिक दुबळेपणा यांचा आढावा घेतला. बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणाले, "१९३४ साली मी दौलताबादचा किल्ला पाहण्यास गेलो असता, तेथील किल्ल्याजवळील हौदातील पाण्याने माझ्या सहकाऱ्यांनी हातपाय धुतले तेव्हा हौद बाटला म्हणून तेथील लहान थोर मुसलमान लोकांनीव व दहा बारा वर्षे वयाच्या एका मुस्लिम मुलीने आम्हाला एक तास शिव्या देवुन आमच्या आयाबहिणीचा उध्दार केला." निजामाच्याच राज्यात अस्पृश्यता पाळली जावी व अशी घटना घडावी ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

दुसरे म्हणजे मी मुंबई व सी.पी. इलाख्यात अडचणीच्या वेळी मुसलमानांना मदत करतो, तेव्हा निजाम सरकारने व मुसलमानांनी आम्हाला मदत करावयास पाहिजे पण असे होत नाही उलट त्यांनी आम्हास सभाबंदी घालावी हे लाजिरवाणे आहे. या संस्थानात अस्पृश्यांसाठी शाळा नसाव्यात ही आश्चर्याची गोष्ट आहे. संस्थानात एकच असपृश्य मुलगा ( जे.एच. सुबय्या ) बी.ए. झाला आहे. पण सर अकबर हैदरी यांना शिफारस पत्र देऊनही व त्यांची स्वत: भेट घेऊनही त्यास नोकरी मिळाली नाही. निजाम सरकारची शिष्यवृत्ती घेऊन या संस्थानातील अनेक विद्यार्थी लंडनला शिक्षणासाठी गेले. पण त्यामध्ये केवळ एकच अस्पृश्य विद्यार्थी होता. कोल्हापूर व बडोदा संस्थानांप्रमाणेच हे संस्थान अस्पृश्यांना शिष्यवृत्ती देऊन लंडनला शिक्षणासाठी पाठवतील ही माझी आशा फोल ठरली. दलितांना उद्देशून बाबासाहेब पुढे म्हणाले, "तुमच्यावर अनंत बंधने आहेत. तुम्हाला भाषणस्वातंत्र्य व मिरवणूक स्वातंत्र्य नाही. तेव्हा मी तुमची दु:खे नाहीशी करण्याचा प्रयत्न करीन. येथील राज्य करण्याची पध्दत सदोष असल्यामुळे तुम्ही आतून काही करु शकत नाही पण मी बाहेरुन जरुर करीन, या परिषदेत पास झालेले सर्व ठराव सर अकबर हैदरी यांच्याकडे पाठवीन."४ मृत जनावरांचे मांस खाणे सोडून दिले पाहिजे असाही सल्ला बाबासाहेबांनी दलितांना दिला.

मक्रणपूर परिषदेनंतर २३ फेब्रुवारी १९४१ रोजी मराठवाड्यातील महार - मांग वतनदारांची परिषद उस्मानाबाद जवळील व सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी तालुक्यातील "तडवळा - ढोकी" येथे आयोजित करण्यात आली. भालेराव गुरुजी हे या परिषदेचे संयोजक होते. तडवडा ढोकीचे दीवचंद कदम हे अध्यक्ष होते, तर बाबुराव बनसोडे हे स्वागताध्यक्ष होते. ही शैक्षणिक परिषद होती. या परिषदेत बाबासाहेबांनी दलितांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेऊन दलितांना मार्गदर्शन केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "हैदराबाद संस्थान देशात श्रीमंत व मोठे संस्थान असूनही येथे अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय नाही. या ठिकाणी लाखो

एकर जमिनी पडीत असूनही निजामाने त्या दलितांना दिलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. दलितांचे कोणतेच प्रश्न सुटलेले नाहीत. आपले प्रश्न सरकारच्या कानावर घालण्यासाठी तुम्ही संघटीत झाले पाहिजे, बावन हक्क, गावकीची कामे व वेठबिकारी करणे बंद करा, मृत मांस खाऊ नका, आपल्या मुलामुलींना शाळेत पाठवा"५

**दलितांच्या राजकीय संघटना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

हैदराबाद राज्यातील दलित संघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनानुसार कार्य करीत होत्या. या संघटनात हैदराबाद स्टेट डिप्रेस्ट क्लासेस असोसिएशन आणि हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संघटनांचा समावेश होतो. हैदराबाद स्टेट डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन या संघटनेचे अध्यक्ष बी.एस. व्यंकटराव यांना हैदराबाद राज्यातील प्रती आंबेडकर समजले जात होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसारच कार्य करीत होते. परंतु ते जेव्हा निजामधार्जीणे बनले व त्यांनी इतेहादुल अल्ला मुसलमीन या संघटनेशी राजकीय युती करुन निजामाच्या आझाद हैदराबाद या कल्पनेस पाठींबा दिला तेव्हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बी.एस. व्यंमटराव व संघटनेशी आपले राजकीय संबंध तोडून टाकले. इ.स. १९४८ पर्यंत डिस्प्रेड क्लासेस असोसिएशन ही संघटना कार्यरत होती. संस्थानातील दलित नेते व प्रजा डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावीत झालेली होती. त्यामुळे त्यांनी १९३६ साली "आंबेडकर तरुण मित्र मंडळ हैदराबाद" या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे अध्यक्ष बी.एस. व्यंकटराव हे होते. पुढे ही संघटना राजकीय जबाबदारी पेलू शकणार नाही, तिच्या सामाजिक कार्याला मर्यादा पडते, म्हणून या संघटनेचे रुपांतर ३१ ऑक्टोबर १९३८ रोजी "हैदराबाद स्टेट डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन" ( अंजुमन - ए - पस्त अरब्वाम ) मध्ये केले गेले. या संघटनेचे अध्यक्ष बी.एस. व्यंकटराव होते तर सरचिटणीस के. जगन्नाथम होते. अल्पावधीतच जे एच. सुबय्या हे या संघटनेचे सरचिटणीस झाले. पी.आर. व्यंकटस्वामी, पालम पिल्ले आणि मराठवाड्यातील बी. शामसुंदर, तुकाराम बनसोडे, बी.जी. मद्रे, तुकाराम गाडे, चोखोबा हिवराळे, माधवराव नेरलीकर, हणमंतराव मोरे, सोपानराव धन्वे, गणपतराव वाघमारे, व्ही.एच. सुरवसे, किसन धावदे, भालेराव गुरुजी, देवीचंद कदम, बापूराव मास्तर, चोखोबा सिरसाट, एन.डी. पगारे, बी.एस. मोरे, बी.टी. भैरव व माधवराव निबंधे हे या संघटनेचे कार्यकर्ते होते. या संघटनेचे उद्देश व कार्य६ पुढीलप्रमाणे होते.

१) दलितांचे संघटन करणे.
२) दलितांमधील जाती व पोटजाती नष्ट करणे.
३) दलितांची गुलामगिरी नष्ट करणे.
४) दलितांना धर्मांतरापासून दूर ठेवणे.
५) दलितांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष करणे आणि त्याची निवेदने सरकारला सादर करणे.
६) दलितांची सामाजिक व मानसिक दुर्बलता नष्ट करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.
७) समाजपरिवर्तनासाठी प्रयत्न करणे.

१९३५ च्या ब्रिटिश सरकारच्या कायद्यानुसार स्थानिक जनतेला प्रशासनात तयाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याचे मान्य केले होते. असाच आदेश ब्रिटिश सरकारने संस्थानिकांनाही दिला होता. त्यानुसार निजामाने जुलै १९३९ मध्ये घटनात्मक सुधारणाची घोषणा केली. पुढे निजामाच्या आदेशाने हैदराबाद संस्थानची राज्यघटना कृष्णा अयंगार यांनी तयार केली. या घटनेनुसार ऐंशी सदस्यांचे एक मंत्रीमंडळ (बाबेहुकूमत) तयार करुन त्यामधील पन्नास टक्के जागा हिंदूना व पन्नास टक्के जागा मुसलमानांना देण्यात आल्या. या ठिकाणी दलितांच्या प्रतिनिधीत्वाचा स्वतंत्रपणे विचार केलेला नव्हता, त्यामुळे डी.सी.ए. चे नेते सालार - ए - आझम रावसाहेब बी.एस. व्यंकटराव यांनी आम्ही हिंदू नसून आम्हाला हिंदूनी हिंदू म्हणून कधीच वागविले नाही, तेव्हा आमची गणना हिंदून न करता आदी हिंदू म्हणून करावी आणि आम्हाला मंत्रिमंडळात स्वतंत्र प्रतिनिधीत्व द्यासे अशी मागणी निजामाकडे केली. तेव्हा निजामाने दलितांना आदी हिंदू समजून हिंदूंच्या कोट्यातील पाच टक्के जागा देऊन त्यांना मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व दिले. या पाच टक्के जागा स्टेट काँग्रेसला सलग कराव्यात की, इत्तेहाद - अल - मुसलमीन या संघटनेस सलग कराव्यात यावरुन डी.सी.ए. च्या कार्यकर्त्यात मतभेद निर्माण झाले. स्टेट काँग्रेस बरोबर या जागा सलग केल्यास दलितांना 'अस्पृश्यता व गुलामगिरी' याशिवाय दुसरे काहीही मिळणार नव्हते, म्हणून बी.एस. व्यंकटरावांनी या पाच टक्के जागा घेऊन इत्तेहाद - अल - मुसलमीन' या निजामाच्या बाजूने असलेल्या संघटनेशी राजकीय धोरण म्हणून युती केली. त्यामुळे दलितांच्या विकासाच्या दृष्टीने अनेक फायदे झाले. पण दलित चळवळीत फूट पडली. त्यामधूनच जे एच. सुबय्या यांच्या नेतृत्वाखाली 'हैदराबाद स्टेट आदी हिंदू महासभा'७ ही नवीन संघटना स्थापन झाली. या संघटनेचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते.

१) अध्यक्ष - जे.एच. सुबय्या
२) मुख्य उपध्यक्ष - आर. लक्ष्मीय्या

३) उपाध्यक्ष - सी.एस. इथीराजन

४) जनरल सचिव - पी.आर. व्यंकटस्वामी

५) सह सचिव - पी.व्ही. मनोहर व एम. आर. कृष्णा

याशिवाय इतर आठ सदस्य होते.

ही संघटना आंबेडकरांच्या विचारानुसार कार्य करीत होती आणि ती निजामाच्या राजकीय धोरणाच्या विरुध्द होती. या संघटनेने दलित वर्गातील अनिष्ठ रुढींना पायबंद घातला. मदिरा प्राशन, मृत जनावरांचे मांस खाणे, देवदेवतांना प्राण्यांचा बळी देणे, देवदासी व जोगतीनी सोडणे, गावकीची कामे करणे, डफ वाजविणे, मृतांच्या घरी मदिरा प्रशन करणे व स्पृश्यांच्या लग्नाच्या वरातीत नाच करणे इत्यादी अनिष्ठ प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

'ऑल इंडिया डिप्रेस्ट क्लासेस पॉलिटिकल कॉन्फरन्स' दि. १८ ते २० जुलै १९४२ रोजी मद्रासचे आमदार रावबहादूर एन.शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला आयोजित केली होती. या कॉन्फरन्सपूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूर मंत्री म्हणून नियुक्ती झाली होती. या पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी बाबासाहेब नागपूरच्या अधिवेशनाला आले. याच अधिवेशनाला हैदराबाद राज्यातून पी.व्ही. मनोहर, जे.एच. सुबय्या, अरिग्य रामस्वामी, सी.एस. इथीराजन, बी.जी. मद्रे, पी.आर. व्यंकटस्वामी, मराठवाड्यातील जातूरचे व्ही.एल. सुर्यवंशी व कन्नडचे बी.एस. मोरे आले होते. बी.एस. व्यंकटराव व औरंगाबादचे बी. शामसुंदर हे डी.सी. ए. चे प्रतिनिधी म्हणून आले होते. यावेळी जे.एच. सुबय्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बाबासाहेबांना हेदराबाद राज्यातील राजकीय घडामोडीची माहिती दिली. तेव्हा व्यंकटराव व जे.एच. सुबय्या यांनी वैयक्तिक मतभेद विसरुन एकत्रितपणे कार्य करावे अशी सूचना अधिवेशनाला आलेल्या विविध राज्यांच्या प्रतिनिधीसमोर केली. जे.एच. सुबय्या व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यंकटरावांच्या नेतृत्वाखाली कार्य करण्याचे मान्य केले. याबाबतीत बाबासाहेबांनी व्यंकटरावांना विचारले असता मी माझ्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करुन एकत्रीकरणाबाबतचा निर्णय घेईल असे त्यांनी उत्तर दिले. तेव्हा व्यंकटरावांच्या विरोधास न जुमानता शेड्युल कास्ट फेडरेशनच्या नावाखाली हैदराबाद संस्थानात चळवळ करण्याचा सल्ला सुबय्या यांना बाबासाहेबांनी दिला. त्यानंतर पी.आर. व्यंकटस्वामी यांनी जे. एच. सुबय्या यांच्या अध्यक्षतेखाली २६ जुलै १९४२ रोजी हैदराबाद स्टेट आदी हिंदू महासभेची बैठक घेतली. याच बैठकीत आदी हिंदू महासभेचे नाव हैदराबाद येथे स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन८ असे ठेवण्यात आले. या संघटनेचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते.

१) अध्यक्ष - जे.एच. सुबय्या

२) उपाध्यक्ष - आर. लक्ष्मीया

३) जनरल सेक्रेटरी - पी.आर. व्यंकटस्वामी

४) सेक्रेटरी - पी.व्ही. मनोहर

५) सदस्य - अरिग्ये रामस्वामी व बी.जी. मद्रे

ही संघटना पूर्णपणे आंबेडकरी विचारांची आणि निजामाच्या राजकीय धोरणाच्या विरुध्द होती. १९४८ पर्यंत ही संघटना कार्यरत होती. या संघटनेचा संबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशन ऑफ इंडिया या भारतीय संघटनेशी होता. या संघटनेची शेड्युल कास्ट फेडरेशन ही एक शाखा होती. या संघटनेचा संबंध संस्थानाबाहेरील संघटनेशी असल्यामुळे आणि या संघटनेने निजाम सरकारकडे जबाबदार सरकारची मागणी केल्यामुळे निजामाने या संघटनेवर बंदी घातली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही संस्थानात येवून सभा घेण्यास निजामाने बंदी घातली होती. या संघटनेचा संबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर असल्यामुळे या संघटनेत मराठवाउ्यातील संपूर्ण दलित समाज सहभागी झाला होता. या संघटनेने हैदराबाद संस्थान भारतात विलीन व्हावे अशी मागणी निकराने केली होती. तसेच या संघटनेने दलित सुधारणेचा सामाजिक प्रश्न घेऊन संस्थानात भरीव स्वरुपाचे कार्य केले. पण या संघटनेस भरीव स्वरुपाचे राजकीय कार्य करता आले नाही. १९४५ मध्ये शेड्युल्ड फेडरेशनच्या वार्षिक सभेत ठराव क्रमांक तीन द्वारे सरकारने वेठबिगारी प्रथा बंद करावी व महारांचे आर्थिक शोषण थांबवावे अशी सरकारकडे मागणी केली. यानंतर डी.सी.ए. आणि शेड्युल कास्ट फेडरेशन या संघटनेच्या कार्यकर्त्यामध्ये संस्थानात सभा व परिषदा घेण्याची स्पर्धाच लागली. डी.सी.ए. ही संघटना निजामधार्जिणी असल्यामुळे या संघटनेला सभा घेण्याची परवानगी होती पण शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संघटनेस सभा घेण्याची परवानगी निजाम सरकार देत नसे. डी.सी.ए. चे नेते बी.एस. व्यंकटराव यांनी मराठवाड्यात १९४३ साली कंधार, जिंतूर व लातूर येथे सभा घेतल्या. यानंतर त्यांनी पूर्णा, औरंगाबाद, परभणी, नांदेड व जालना येथे सभा घेतल्या. नोव्हेंबर १९४६ मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशनने औरंगाबादला अधिवेशन घेतले. त्यामध्ये नाशिकचे भाऊराव गायकवाड उर्फ कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी दलितांना मार्गदर्शन केले व अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. यानंतर डी.सी.ए. ची सेलू,

परभणी व गुंजोटी येथे वार्षिक अधिवेशने घेण्यात आली. हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन तर्फे अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या नेत्यांची परिषद १९४७ मध्ये प्रथम लातूर व नंतर हैदराबादला घेण्याचे ठरले होते. पण ही परिषद होऊ शकली नाही. २३ जून १९४५ रोजी काही असंतुष्ट नेत्यांनी स्वतंत्र शेड्युल्ड कास्ट फेडरेशन[९] ही संघटना स्थापन केली होती. या संघटनेची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे होती.

१) अध्यक्ष - अरिग्ये रामस्वामी
२) उपाध्यक्ष - बी. शामसुंदर
३) जनरल सेक्रेटरी - जी. अर्जूनकुमार
४) कोषाध्यक्ष - के. रत्नय्या
५) सदस्य - अनेक तेलगू भाषिक

या संघटनेच्या बी. शामसुंदर आणि अरिग्ये रामस्वामी यांनी ऑक्टोबर १९४५ साली निजामाबाद, औरंगाबाद, परभणी, पूर्णा व नांदेड येथे कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन कार्यक्रमाची रुपरेषा तयार केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संबंध फक्त जे.एच. सुबय्या यांच्या हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संघटनेशी होता. असे असूनही डी.सी.ए. चे बी.एस. व्यंकटराव, स्वतंत्र शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे बी. शामसुंदर व शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे जे.एच. सुबय्या हे आपापल्या सभा व परिषदांच्या वेळी कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहणार असल्याचे जाहीर करत असत. त्यामुळे कार्यक्रमास दलितांची गर्दी वाढत असे, परंतु शेवटी त्यांची निराशाच होत असे. कारण बाबासाहेब आंबेडकरांना संस्थानात सभा घेण्याची बंदी असल्यामुळे ते येऊ शकत नव्हते.याशिवाय डी.सी.ए. व स्वतंत्र शेड्युल्ड कास्ट फेडरेशनशी बाबासाहेबांचा संबंध नसल्यामुळे त्यांच्या सभांना ते कसे काय येणार ?

डिसेंबर १९४५ मध्ये पी.आर. व्यंकटस्वामी यांनी जे.एच. सुबय्या, अरिग्ये रामस्वामी, बी. शामसुंदर, बी.एस. व्यंकटराव पालम पिल्ले यांची आदी हिंदू भवनात बेठक आयोजित केली. या बैठकीत सर्वांनी वैयक्तिक मतभेद विसरुन एका मध्यवर्ती संघटनेची स्थापना करावी अशी विनंती. पी.आर. व्यंकटस्वामी यांनी केली, परंतु या बैठकीस बी.एस. व्यंकटराव उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे ऐक्य होऊ शकले नाही. पुढे बी. शामसुंदर हे पदवीधर मतदार संघातून असेंब्लीत निवडून गेल्यावर त्यांनी व्यंकटरावाशी जुळवून घेतले. त्यामुळे बी.एस. व्यंकटराव हे जेव्हा निजामाच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री ( सालार - ए - आझम ) झाले तेव्हा बी. शामसुंदर हे डी.सी.ए. चे अध्यक्ष बनले. अशा रीतीने हैदराबाद संस्थान भारतात विलीन होईपर्यंत डी.सी.ए. व शेड्युल्ड कास्ट फेडरेशन यांच्यात ऐक्य होऊ शकले नाही.

### निजामाला बाबासाहेबांचा सल्ला :

हैदराबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करुन घेण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे. राज्यातील दलित चळवळ बाबासाहेबांच्या विचारानुसार व प्रेरणेने कार्य करीत होती. हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन ही संघटना आंबेडकरी विचारांची होती. या संघटनेचे नेते जे.एच. सुबय्या यांनी निजामाकडे जबाबदार सरकारची मागणी केली होती. या मागणीस स्टेट कॉंग्रेसने पाठींबा दिला होता. पुढे स्टेट कॉंग्रेसने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्याची मागणी केली, तेव्हा हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशनया संघटनेने ही मागणी शेवटपर्यंत उचलून धरली होती. हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले पाहिजे अशी डॉ. आंबेडकरांची पूर्वीपासूनच भूमिका होती. या भूमिकेतूनच त्यांनी ५ जून १९४७ चा फ्रि प्रेस जर्नल, १८ जून १९४७ चा दि बॉम्बे क्रॉनिकल, ८ जुलै १९४७ चा दि टाइम्स ऑफ इंडिया, २८ नोव्हेंबर १९४७ चा नॅशनल स्टँडड्र आणि जनता या वर्तमानपत्रातून निजामाच्या विरुध्द आपली माते व पत्रके प्रसिध्द केली होती.

हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी आपले राज्य स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली. ते इत्तेहादुल अल मुसलमीन या संघटनेच्या बळावर आझाद हैदराबादची स्वप्न पाहत होते. रझाकारांच्या बळावर आझाद हैदराबादची निजामाने केलेली घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गंभीर वाटली. निजामाच्या घोषणेची गांभिर्याने दखल घेऊन त्यांनी हैदराबाद राज्य भारतात विलीन करण्याचा सल्ला निजामाला दिला. तसेच आपले संस्थान स्वतंत्र ठेवून त्यास संयुक्त राष्ट्र संघाची मान्यता व संरक्षण मिळविण्याचा प्रयत्न करणे व तशी आशा करणे म्हणजे आपण आपल्या कल्पनेच्या साम्राज्यात व्यर्थ वावरण्यासारखे आहे असा इशाराही[१०] त्यांनी निजामाला दिला होता.

### निजामाच्या धोरणाविरुध्द आवाज :

हैदराबादच्या निजामाने ११ जून १९४७ रोजी आझाद हैदराबादची घोषणा केली. निजामाच्या या धोरणाविरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आवाज उठविला आणि हैदराबाद राज्य भारतात विलीन केले पाहिजे असा आग्रह धरला. हैदराबाद स्टेट

शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष जे.एच. सुबय्या यांनी सिकंदराबाद येथे इ.स. १९४४ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन[११] ही संघटना हैदराबादच्या निजामाशी स्वातंत्र्यासाठी लढा देत आहे. हा लढा शेवटपर्यंत चालू ठेवावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निजामाला पुढील प्रमाणे इशारा दिला.

Dr. B.R. Ambedkar has given a timely warning to both the Indian States and the Interim Government. The satates cannot have an existence apart from the Indian Union. People of India will never recognise any Indian State as a Sovereign Independent State. The Indian States are part and parcel of India. The Union cannot permit them to exist within it as islands of isolation. Hyderabad move will lead to Balkanization. The United Nations Organistion will never grant any assistance to an Indian State against external aggression or internal commotion without insisting upon the States first introducing responsible Government Government. Whatever the choice of the Indian States may be, the duty of the people of Indian is clear. On their behalf, the Interim Government should notify His Majesty's Governement that the British Parliament has no right to pass any law abrogating paramountcy. Government of India will never recognise any Indian State as a Sovereign Independent State. The announcement by Travancore and Hyderabad and the inclination shown by other states to follow their example has created a new problem which may turn out to be worse than the Hindu - Muslim problem as it is sure to result in the further Balkanization of India.[12]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे कायदेमंत्री होते.गृहमंत्री सरदार पटेल यांनी हैदराबाद संस्थान भारतात विलीन करुन घेण्यासाठी लष्करी कारवाई करण्याचे ठरविले. त्यापूर्वी त्यांनी डॉ. आंबेडकराबरोबर त्याबाबत चर्चा केली. त्यावेळी बाबासाहेबांनी त्यांना नेटाने१३ पाठींबा दिला. त्यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थानावर भारत सरकारने लष्करी कारवाई केली व १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्करली.

**निजाम आपला शत्रु आहे :**

हैदराबाद स्टेट काँग्रेसने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद राज्याच्या स्वातंत्र्यासाठी आंदोलन सुरु केले. या आंदोलनात सहभागी होऊन राज्यातील दलितांनी निजामाशी लढा द्यावा कारण निजाम हा आपला व आपल्या मात्रभुमीचा शत्रु आहे असा संदेश आणि आदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यातील दलित समाजाला दिला. ते म्हणतात, हैदराबाद संस्थानातील अस्पृश्य बांधवांना मी असा इशारा देतो की, मुसलमानांच्या छळापासून बचाव करण्यासाठी सुखा सुखी कोणीही धर्मांतर करु नका. जबरदस्तीने मुसलमान झालेल्या अस्पृश्यांनी आपण कायमचे मुसलमान झालो असेही समजू नये. ते कधीही आपल्या धर्मात परत येऊ शकतात व त्यांना सन्मानाने वागविले जाईल. अस्पृश्यांनी कोणत्याही परिस्थितीत आणि किती संकटे ओढवली तरी निजाम व इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेला साथ देऊ नये. सवर्ण हिंदू आपणावर कितीही जुलूम करीत असोत, त्यामुळे आपण आपली बुध्दी बहकू देता कामा नये आणि त्यांच्याविषयीच्या रागामुळे आपली जात सोडून देऊन आपल्या शत्रूला सामील होता कामा नये. अस्पृश्यांचा झगडा स्वातंत्र्यासाठी असून त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हवे आहे, म्हणून ते स्वातंत्र्यासाठी झगडत आहेत. निजाम हा स्वातंत्र्याचा शत्रु आहे. त्या स्वातंत्र्याच्या शत्रुबरोबर अस्पृश्यांनी संगनमत केले तर त्यांचा मोठा घात होईल निजाम हा हिंदुस्थानचा, आपल्या मातृभूमीचा शत्रु आहे ही गोष्ट स्पृश्यांनी लक्षात घेतली पाहिजे. हैदराबाद संस्थान भारतात सामील झालेच पाहिजे व त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे. कारण हिंदुस्थानची भौगोलिक एकता व अखंडता बिघडू देण्याचा हकक`ाणत्याही संस्थानाला नाही. हिंदी संघराज्याला जो विरोध निजामाने चालविला आहे. त्याबद्दल यत्किंचीतही गय करता कामा नये. निजामाला हे कळले पाहिजे की, हिंदी संघ राज्यात तो जर सामील झाला आणि हिंदी राज्यघटनेने जर त्याच्या घराण्याला अभयवचन दिले तर त्याचे राजपद सुरक्षित होईल. इत्तेहादुल मुसलमानावर विश्वास टाकण्यापेक्षा हिंदूचा विश्वास संपादन करण्यात त्याला जास्त सुरक्षितता आहे. तथापी त्याने कसे वागावे हा त्याचा प्रश्न आहे. मला आज फक्त एवढीच तळमळ लागली आहे की, माझ्या बांधवानी त्याला साथ देऊन आपल्या जातीच्या इमानदारीला काळीमा फासू नये, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, निजाम हा अस्पृश्यांचा व अस्पृश्यांच्या मातृभूमीचा शत्रू आहे. अस्पृश्य जाती ह्या भारतभूमीची पहिली लेकरे आहेत. या हिंदुस्थानचे अस्पृश्य आदिसंतान आहेत. हिंदुस्थानातील इतर काही जातीची हिंद ही जितकी मातृभूमी आहे तितकीच ती अस्पृश्यांचीही मातृभूमी आहे या मायभूमीच्या मोठेपणासाठी त्यांनी झगडले पाहिजे. मायभूमीचे स्वातंत्र्य व तिचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी त्यांनी जिवाभावाने लढण्यास तयार झाले पाहिजे. हिंदुस्थान हे आपले घर आहे, आपले वतन आहे, ही गोष्ट अस्पृश्यांनी कधी विसरता कामा नये.१४

**भारत सरकारला कायदेशीर मार्गदर्शन :**

११ जून १९४७ रोजी हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान बहादूर यांनी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याची घोषणा केली याशिवाय पोलीस व रझाकार राज्यातील जनतेवर अन्याय अत्याचार करीत होतेच.

हैदराबाद राज्यातील जनतेने सुरु केलेले सशस्त्र आंदोलन आणि निजामाचे पोलीस व रझाकार हे जनतेवर करीत असलेल्या अन्याय अत्याचारावर भारत सरकार लक्ष ठेवून होते. निजाम मीर उस्मान अलीखान हे भारतीय संघराज्यात आपले राज्य विलीन करण्यास तयार होत नसल्यामुळे आणि त्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे भारत सरकारला १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्यावर पोलिस कारवाई करावी लागली. या घटनेस ऑपरेशन पोलो असेही म्हणतात, वास्तविक पाहता भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई केली होती. परंतु लष्करी कारवाई असे म्हटल्यास कायदेशीर आंतरराष्ट्रीय प्रश्न निमा्रण होईल. म्हणून या कारवाईस कायदेमंत्री डॉ. भीमराव रामजी ऊर्फ बाबासाहेब आंबेडकरांनी पोलिस ॲक्शन असे नाव देण्याचे भारत सरकारला सूचविले. कारण पोलिस ॲक्शन या शब्दामुळे हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न हा भारताचा अंतर्गत प्रश्न ठरणार होता.

स्वामी व दिगंबरराव बिंदू यांनी पंडित नेहरु, महात्मा गांधी व सरकार वल्लभभाई पटेल यांच्याशी चर्चा करुन हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी भारत सरकारने पोलिस कारवाई करावी अशी त्यांना विनंती केली होती. त्यानुसार भारत सरकारने लोकहितासाठी या राज्यावर अॅक्शन घेण्याचे ठरविले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी पहाटे चार वाजता पोलिस कारवाई१५ सुरु झाली. त्याच दिवशी स्टेट कॉंग्रेसच्या कृति समितीने नागपूरला बैठक घेऊन या बैठकीत निजामाला पदच्युत करण्याची मागणी करणारा ठराव पास केला होता.

हैदराबाद राज्यावरील पोलिस कारवाईचे प्रमुख संचालक लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी, सदर्न कमांड होते. या कारवाईचे नियंत्रण, नियमन व मार्गदर्शन त्यांनीच केले. हैदराबाद राज्यात एकाचवेळी पाच दिशेने भारतीय लष्कराने प्रवेश करुन कारवाई सुरु केली. लष्कराची विभागणी पाच भागात करण्यात आली होती. राजेंद्र सिंहजी यांच्या मदतीला पुढील लष्करी विभागणी अधिकारी होते. प्रत्येकाकडे एका स्वतंत्र विभागाचे नेतृत्व दिले होते.

१) मेजर जनरल जयंतीनाथ - सोलापूरहून प्रवेश करणाऱ्या सशस्त्र दलाचे कमांडर
२) मेजर जनरल डी.एस. ब्रार - सोलापूरच्या उत्तरेस मुंबई विभागातील दलाचे कमांडर
३) ब्रिगेडियर शिवदत्त सिंग - मध्यप्रांत व वऱ्हाडकडचे कमांडर
४) मेजर जनरल ए.ए. सुंद्रा - मद्रास समितीचे कमांडर
५) एअर व्हाईस मार्शन मुखर्जी - संपूर्ण हवाई हालचालीचे व कृतीचे नियंत्रक, निजामाने आपल्या लष्कराची विभागणी चार गळात केली होती, प्रत्येक गटाचा प्रमुख व त्याच्याकडे असलेल्या विभागाची माहिती पुढील प्रमाणे,

१) उत्तर विभाग - या विभागाचे प्रमुख कमांडर ब्रिगेडियर तौफिक अली होते. या विभागात औरंगाबाद, परभणी, नांदेड, आदिलाबाद व निजामाबाद या जिल्ह्यांचा समावेश होता.
२) पूर्व विभाग - या विभागाचे प्रमुख ब्रिगेडियर महंमद हुसेन खान होते, या विभागात नलगोंडा, वरंगल व करीमनगर जिल्ह्याचा समावेश होता.
३) दक्षिण विभाग - या विभागाचे प्रमुख लेफ्टनंद कर्नल अली अहमद होते, या विीागात गुलबर्गा, रायचूर व महबूबनगर या जिल्ह्याचा समावेश होतो.
४) पश्चिम विभाग - या विभागाचे प्रमुख ब्रिगेडियर सईदी हमीब अहमद असून या विभागात बीदर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्याचा समावेश होता.

अशा रीतीने भारतीय लष्करांनी पाच भिन्न दिशेने ( वायव्येस औरंगाबाद, पश्चिमेला सोलापूर, ईशान्येला आदिलाबाद, दक्षिणेस कर्नुल व आग्नेयेस विजयवाडा ) हैदराबाद राज्यात प्रवेश करुन निजामी पोलिस व रझाकारांशी लढाई सुरु केली. सुरुवातीला रझाकारांनी चांगला प्रतिकार केला, परंतु नंतर मात्र त्यांचा भारतीय लष्करापुढे निभाव लागला नाही. १७ सप्टेंबरला सायंकाळी पाच वाजता मीर उस्मानअली खान बहादूर या निजामाने हैदराबाद रेडिओ स्टेशनवर भाषण केले व आपण युध्द थांबवित असल्याची घोषणा केली. यानंतर हैदराबाद लष्कराचे प्रमुख जनरल अलुइद्रीस यांनी हैदराबाद शरण येत असल्याचे जाहीर केले. त्याच दिवशी हैदराबादचे पंतप्रधान मीर लायक अली यांनी नभावाणीवरुन भाषण केले आणि आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. अशा प्रकारे केवळ १०९ तासात पोलिस कारवाई यशस्वी झाली. हैदराबाद राज्य स्वतंत्र झाले, अर्थात ते भारतात विलीन झाले निजामाने शरणागत पत्करताच स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांची तुरुंगातून सुटा करण्यात आली. यानंतर जनरल चौधरींनी हैदराबाद

राज्याचा राज्यकारभार ताब्यात घेतला. ते १४ महिने तेथील ष्करी प्रशासक होते. १ डिसेंबर १९४९ रोजी त्यांच्या जागी नागरी प्रशासक म्हणून एम.के. वेलोडी आले. जे.एन. चौधरी यांच्या लष्करी प्रशासनात डी.एस. बखले, डी.आर. प्रधान, नवाब झैन यार जंग आणि राजा धुंडीराज यांचा समावेश होता. चौधरी यांनी राज्यात कायदा व सुव्यवस्था निर्माण केली. यावरुन स्पष्ट होते की, केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायदेशीर मार्गदर्शनानुसार पोलीस कारवाई केल्यामुळेच हैदराबादउ राज्य भारतीय संघराज्यात विलीन करुन घेण्यात भारत सरकारला यश मिळाले.

## समारोप :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील संपूर्ण मानव जातीच्या हक्क, अधिकार, समता आणि कल्याणासाठी चळवळ करणारे लढवये आहेत. त्यांनी अस्पृश्य समाजाचे जीवन जवळून पाहिले आणि स्वत:ही अनुभवले. त्यामुळेच अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी आणि समतेसाठी त्यांनी आयुष्यभर चळवळी केल्या. एवढेच नाही तर त्यांनी देशातील विविध संस्थाने आणि राज्यातील दलित चळवळीवर लक्ष केंद्रित करुन त्या चळवळी वाढविण्याचा प्रयत्न केला. हैदराबाद राज्यातील दलित चळवळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसारच वाअचाल करीत होती. या राज्यातील अस्पृश्य समाजाच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणणे आणि अस्पृश्यांना त्यांचे हक्क आणि अधिकार प्राप्त करुन देणे हे या चळवळीचे उद्देश होते. बी.एस व्यंकटराव, जे एच. सुबय्या, भाऊराव मोरे, व्ही.एल. सुर्यवंशी आणि पी.आर. व्यंकटस्वामी हे हैदराबाद राज्यातील दलित चळवळीचे पुढारी होते. बी.एस. व्यंकटराव यांना तर हैदराबाद राज्यातील प्रति आंबेडकर समजले जात होते. नंतर ते निजामधार्जिणे झाले. हा भाग वेगळा हैदराबाद राज्यातील चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे उदयास आली व विकसित झाली. या चळवळीने हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात फार मोठे योगदान दिले. हैदराबाद राज्य स्वतंत्र रहाणे भारताच्या हिताचे नव्हते याची जाणवी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यामुळेच त्यांनी हैदराबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संघटनेस स्वातंत्र्यासाठी निजाम सरकारच्या विरोधात लढादेण्याचा आदेश दिला. येथे बाबासाहेबांनी केवळ देशाचे अखंडत्व पाहिले. केवळ देशहितासाठी त्यांनी हैदराबाद राज्यातील दलित चळवळीवर लक्ष केंद्रीत केले व त्यांनी राज्यातील निजामाशी हैदराबाद राज्यावर लक्ष्करी कारवाई करण्यापूर्वी ही भारताचे उप पंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बाबासाहेबांना कायदेशीर सल्ला विचारला होता. तेव्हाही बाबासाहेबांनी त्यांना नेटाने पाठींबा देऊन या लष्करी कारवाईस पोलिस ॲक्शन नाव देण्याचे सुचविले. पुढे भारताने केलेल्या लष्करी कारवाईत निजामाचा पराभव झाला. आणि हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले. यामध्ये बाबासाहेबांचे योगदान महत्त्वाचे ठरते. भारताच्या निर्मितीत आणि भारताचे अखंडत्व टिकविण्यात बाबासाहेब अग्रणी ठरले. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांची आणि चळवळीची आज आवश्यकता निर्माण झाली आहे.

## संदर्भ सूची :-


१. भालेराव अनंत (२००१), हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई, पृ. ३
२. भंते, एस. विशुध्दानंद ( संपा. ) (१९८४), प्रज्ञावंत वर्ष पहिले, अंक सातवा, विशेषांक, पृ.११-१३.
३. जनता, ६ मार्च १९३७, पृ. २.
४. जनता, १४ जानेवारी १९३९.
५. जनता, १८ फेब्रुवारी १९३९, पृ. ७.
६. Venkat Swami P.R., Our Struggle for Emancipation, Vol- I, Hyderabad, १९५५, P. १३१, ३२, ३५, ३६.
७. Ibid, P. २१९.
८. गायकवाड डॉ. नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन, १९९० पुणे, पृ. ३०
९. कित्ता.
१०. कीर धनंजय (१९९२), डॉ. बाबासाहेब आंबेडढकर चरित्र, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, पृ.४०८.
११. नरवाडे, डॉ. एस.एस. (१९८८), डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. ४७.
१२. कित्ता, पृ.४८.
१३. कीर धनंजय, पूर्वोक्त, पृ.४१४.
१४. The Free press Journal, Bombay, Dt. २८ Nov. १९४७,P. ३.
१५. देऊळगावकर, वि.पां. ( अनु. ) २००१, स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, मुंबई, म.रा. सा. आणि संस्कृती मंडळ, पृ.२६.